
(Marathi) (P)

1016
9191

1523 1 P

॥ श्रीगुरु समर्थ ॥

# भगतसिंगाचा पोवाडा.



लेखक व प्रकाशक

शाहीर अश्विनीकुमार

सर्व प्रकारचे हक्क लेखकानी स्वाधीन ठेविलें आहेत.

सन १९३१

आवृत्ती १ ली ) किंमत १ आणा ( प्रती ५०००

IMPERIAL RECORD
RECEIVED.
11 NOV. 1931
DEPARTMENT

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1523
Date 15.1.72
GOVT. OF INDIA

|| श्रीगुरु समर्थ ||

# भगत सिंगाचा पोवाडा.

( चाल:—धन्य शिवाजी )

आडवण १ ली.

धन्य भगतसिंग धन्य राजगुरु धन्यची सुखदेव ।
राष्ट्रा करितां प्राणची देण्यां झाले तयार ।। धृ० ।।
तरुण वीर सज्ज जहाले स्वातंत्र्यासाठीं ।
भगतसिंग हा तयार झाला क्रांतीचेसाठीं ।।
सायमनजाई पंजाबाला रिपोर्टासाठीं ।
सर्व पुढारी करिती तयारी बहिष्कारासाठीं ।। १ ।।
लाला आमुचा चमकत होता मिरवणूक ठायीं ।
पोलिसानीं लाठी चालविली अनारकली चौकात ।
चिडला गोरा धावत आला खुपशि लाठी कुशींत ।।
जोराचा तो धक्का बसला लजपत रायास ।।२।।
लाठी लागतां कुशित त्यांच्या पडले मूर्छित ।
पडे धाक सरकाराला कमिशन नेंमले सत्वर ।।
सरकाराला दिला ईसारा हिंद वासीयानें ।
सिवील मधिल नको ऑफिसर नेमा सत्यानें ।। ३ ।।
सात वाजतां प्रातकाळीं झडप घाली यमदूत ।
हंसत मुखानी स्वर्गी गेला, पंजाबाचा दूत ।। ४ ।।

आडवण २ री

एक महिना लोटुनी गेला झाले दुखः सरकारास ।
क्रांती कारकाचा झाला उसाळा शहर लाहोरांत ।।

तरुण चिडले दुखिःत झाले घेण्या सुड लालाचा ।
मर्दपणाचा बाणा होता वीर भगतसिंगाचा ॥ १ ॥
वीर आमचा शूर सुखदेव बोले भाषा सुडाची ।
त्या टोकाचा वीर भगतसिंग मधील सुखदेव ॥
बंगाल्याचा वीर अभिमन्यु बटुकेश्वर दत्त ।
महाराष्ट्राचा सैनीक राजगुरू त्यांच्या मदतीस ॥ २ ॥
चौघे वीर चौहो बाजुचे झाले समरास सज्ज ।
शूर शिपाई बांधी कमरा मरण स्टॉकाचे इच्छीत ॥
कैसा सुड घ्यावें आतां पडे तिघे विचारांत ।
दैवावरती बोल ठेवोनीं निघाले वीर युद्धास ॥ ३ ॥
सायकलिवर स्वार होवोनीं दिधला वेढा चौकीस ।
तारिख १७ महिना शेवटचा गोऱ्यांच्या आनंदाचा ॥
बळकट दोरी आयुष्याची सार्जंटस्कॉटाची ।
त्या वेळेला सॉण्डर्स चननसिंग वेळ घरी जाण्याची ॥४॥
जय गोपालने दिला ईशारा गुरू भगतसिंगास ।
झाडी पिस्तुल सॉण्डर्सावर प्राण गेला निघोन ॥
पकडण्यासाठीं मागें धावला वीर चननसिंग ।
भगतसिंगावर झडप घातली चननसिंगान ॥ ५ ॥
गोळी घातली त्यांच्या वरिही सेनापती विरान ।
तरी धावला त्यांच्या मागुन साण्डर्स मारा गया ह्मणुन ॥
मूर्छित पडला तोही बिचारा नेले त्यास काळान ।
सर्व निसटले कोणी न सांपडे तपास चाले जोरान ६

शोध करूनीं थकले सारे अखेर लाविले बक्षीस ।
पांचशें बक्षीस सरकाराचे ५००० हजार माझे ॥
लगेच दुसरी जाहिरात फडके शहर लाहोरांत ।
माकड चेष्टा चालू होत्या साऱ्या पंजाबांत ॥ ७ ॥
एक वर्ष लोटुनीं गेले कोणी न पकडे विरास ।
सर्व वीर फिरे आनंदे शेवटीं पोंहचे दिल्लीस ॥
विर राजगुरू आनंदानें दाखल झाला पुण्यास ।
शांततेनें दिवस घालवी विचार करितसे मनांत ॥ ८ ॥

आठवण ३ री

सन एकोणतिस एप्रील महिना काळ सेफ्टी बिलांचा ॥
बरोबरिचें मत पडले निर्णय न लागे शेवटचा ॥
एकमत शेवटीं राहिलें अध्यक्ष पटेलांचे ।
ईकडे सरकार तिकडे पटेल चाले युद्ध जोरांचे ॥ १ ॥
सरकार न मानें पटेल न मानीं निर्णय ठरले अखेरीचें ।
दिवस सोमवार तारीख ८ एप्रिल महिन्याची ॥
उठले पटेल निर्णय देण्या बाँब फेकला दत्तानें ।
छीन्न भिन्न खुर्च्या झाल्या लोक पळाले धाकाने ॥ २ ॥
पोलिसांनीं लगेच पकडिले वीर भगतसिंगास ।
पोलिसांचे कृत्य पाहूनी रोखिले पिस्तूल मर्दानें ॥
दहा पांच धावुनीं गेले पकडिलें पुन्हां दत्तास ।
टाकुनीं हातकड्या हातीं दोघांच्या पाठविले तुरुंगास ॥३॥

सेशन्स कोर्टात चाले खटला दत्त भगतसिंगाचा ।
मत आपले प्रगट केले उपाय न चाले कोणाचा ॥
अखेर दोषी ठरवुनीं त्यांना पाठविले काळे पाण्याला
आनंदानीं दोघे विरानीं केली न पर्वा देहांची ॥ ४ ॥

( आडवण चौथी )

कांहिं दिवसांनीं लागे सुगावा साण्डर्सच्या खुनाचा ।
फुलटे कटातूनी ललित हंस आणि जयगोपाल ॥
दिली माहिती करुनीं आम्हां सरकाराचे बोल ।
आरोप लाधिले भगतसिंग गुरु सुखदेवावर ॥ १ ॥
गुरु आमचा पुणे शहरीं राहे टिळक रोडावर ।
पोलिसांनीं तारिख ३० सन एकोणतीस सप्टेंबरीं ॥
प्रातकाळीं पकडूनीं नेलें केले रवाना लाहोरीं ।
राज्य इंग्रजी उलथण्याचा आरोप लाधी तिघावर २
जुनें पुराणें आरोप लाधे आमचे मा बाप सरकार ।
तारिख पहिली काढी अर्डीन्स लार्ड अर्विन ॥
स्पेशल कोर्ट नेमे तिघांचे न्याय होई एका बाजून ।
सात अक्टोबर सायंकाळीं होत शिक्षा फांशिची ॥ ३ ॥

आडवण शेवटची

केले प्रयत्न अनेक रुपानीं त्यांच्या वडीलांनीं ।
तसेच प्रयत्न केले साऱ्या हिंद वासियांनीं ॥
गांधी माहात्मा करी विनवणीं अनेक रुपानीं ।
हट्टा पेटली नोकशाही अर्ज टाकी लाथाडोनीं ॥ १ ॥

सरते शेवटीं प्रीव्ही कौन्सीला केला अर्ज शेवटचा ।
बॅरीष्टर सरकाराचा निकाल मागे त्वरेचा ॥
हायकोर्टाकडे अर्ज करोनीं निकाल लावी शेवटचा ।
सरते शेवटीं हायकोर्टानीं निकाल दिला फाशीचा ॥२॥
फाशी आतां निच्छीत झाली वीरा भगतसिंगास ।
जेल म्यान्युअल ऐसा आहे सकाळीं फाशी देण्याचा ।
ठरले त्यांना सायंकाळीं फांशी देण्याची ॥
गप्पागोष्टी करीत होते वीर बंदीवासी ॥ ३ ॥
सायंकाळीं पांच वाजतां आलें बोलवणें त्यांना ।
मॅजिस्ट्रेटची गांठ पडतां स्वातंत्र्याचे शिपाई ॥
फासावरती कैसे जाती पहा तुम्ही डोळयांनीं ।
मॅजिस्ट्रेट थक्क जाहले भाषा ऐकुनी वीरांची ॥ ४ ॥
उड्या मारुनी उभे राहिले फासाचे स्थानीं ।
फाशिचा दोर गुंडाळीता चुंमन घेतले मर्दांनीं ॥
पुन्हां मॅजिस्ट्रेट पुसे त्यांना कसें वाटते तुम्हांस ।
वीर भगतसिंग उत्तर देई आम्ही जातो गांवास ॥ ५ ॥
सुखदेव बोले लगेच पोहचुं आपले मंडळांत ।
चंद्रसेखर वाट पाहतो जतिंद्रनाथ करील स्वागत ॥
अखेर वेळी मिठ्या मारील्या तिघा भावांनीं ।
ऐसी फासी झाली तिघास हातांत न राहे लेखणी ॥६॥
दुःख पहिले शाहीरास अति दुःख भारत मातेस ।

ज्वालागिरी फाटूनीं जाई ऐसे दुःख मातापितरास ॥
आंकांत जाहला देशांत कुठवर पाहि देव अंत ।
लिहीतानां हा पोवाडा भड भडले हृदय ॥ ७ ॥

( सुचना शाहिराची )

पोवाड्यांतील सारी विधानें आहे सरकाराची ।
खरें खोटें देवा ठावें निर्दोष गेले फसावरती ॥
ऐसि जनता बोलत नच ठावे शाहिरासी ।
कवी कुमार म्हणे खऱ्या खोट्याचा ईश्वर वाली ॥ १ ॥

## ( हिरा हरपला )

### ॥ वीर राजगुरु ॥

( चाल–आनंदाचा कंद हरी हा )

भारतांत राजगुरु प्रगटले । स्वातंत्र्या ते घ्यावया ।
दास्यपाश ते तोडूनि देशा । मुक्ती सुखाची द्यावया ॥ धृ ॥
जुल्म वाढला जागृत झाला । इच्छित हिंद स्वराज्य हा ।
हिंद जनाचे दैन्य सदाचे । ऱ्हास तयाचा व्हावया ॥ १ ॥
सत्ता वरणें अंध बनोनी । भूप चालवी लाठीराज ॥
न्याय तुडवितां फासावती । वीरा आमुच्या घ्यावया ॥२॥
सारजंटाचा बसे कोरडा । मनीं ओरडा कोण घे ॥

1523

नित्य नवे ॲार्डिनन्स निघती । सत्ता चिर टिकवाया ॥३॥
सोलापूर पेशावर झाला । गोळ्यांचा वर्षावाना ॥
लष्करी सत्ता होऊन मत्ता । दीनांचा बळी घ्यावया ॥ ४ ॥
वडाळाशी त्या सत्त्याग्रहिणीं । हंसत मुखें आव्हा निल्या ॥
सारजंटाच्या लाठ्या स्वजनां । शांतीपाठ पटवावया ॥ ५ ॥
वरली माजी तसेंच घडले । भेंडीबाजारी हें पहा ॥
श्वाना कारणें हत्या करणें । शांतीपाठ पाठवावया ॥ ६ ॥
सत्त्याग्रहीने शांति स्थापिती । पोलिस कामा येईना ॥
निशिदिनीं श्रमिती स्वजनानमिती । शांतिव्रता यश यावया
पिकेटींग व्हाइटवे दुकानीं । करितां होई कैदजनां ॥
एका धरती द्रिगुणीत होती । सोडूनि विपदांच्या भया ८
अझाद मैदानांत कोंडिलें । निशस्त्रा प्रति झोडिलें ॥
दीन पालनत-दया वितरणा । कां मनीं करुणा बा नये ॥
ते तूं जग त्राता असतां जाऊं । अन्य कुणा विनवावया १०

समाप्त.

# आमची खाली लिहिलेलीं पुस्तके विक्रीस तयार

| | |
|---|---|
| वाङ्मय वैजयंती | किं ८ आणे |
| सिंहगड पोवाडा | किं. २॥ आणे |
| सुधारणेचा, चुटका | ४ भाग किं. प्र. एक आणा |
| ( बर्मा इंडीया सिलोन ) प्रभात फेरी | किं. १ आणा |
| नागपुर दंगा | किं. अर्धा आणा |
| रणशिंग फुंका | किं १ आणा |
| मालीनबाई | किं १ आणा |
| अफझुल खानाचा पोवाडा | किं० १॥ आणा |

पंजाबचे रक्त—( स० स्थितीवरील चटकदार, हृदयंगम ) कादंबरी छापत आहे

पुस्तकें मिळण्याचा पत्ता—

**एल० बी० रेगुंडेवार उर्फ अश्विनी कुमार**

श्राफ बिल्डींग खेतवाडी मेनरोड मुंबई नं० ४

मुं ब ई त

स्वच्छ आणि हवेशीर

अशी

रहाण्याची व भोजनाची उत्कृष्ट सोय

म्हणजे

# गिरगांवांत असलेला

# माधवाश्रम.

टेलीफोन नं. ४२४८४

उत्तम व्यवस्था !

अगदीं माफक दर

ट्रॅम, बस, रेल्वे व समुद्र नजीक, गिरगांव मुंबई.

मुद्रकः— जे. बी. देसाई. सम्राट वैभव प्रेस, ११ खेतवाडी, मुंबई नं. ४.